## महाराष्ट्र शासन

## कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२

वाहन चालकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे (सेवा पुरवठादार/ कंत्राटदार यांच्याकडून) करुन घेण्याकरिता नोंदणीकृत संस्थेचे अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | वाहन चालक | वयोमर्यादा किमान २१ वर्षे.<br>उमेदवार किमान १० वी उत्तीर्ण असावा.<br>वाहन चालविण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव असावा.<br>उमेदवाराकडे चारचाकी वाहन चालनाचा परवाना असावा.<br>उमेदवारास मराठी भाषा बोलता, लिहिता व वाचता आली पाहिजे. | ३ |

प्रस्तुत वाहन चालकांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक पदनि २०१३/ प्र.क्र.११/१३/विसु-१, दि.२.२.२०१३ अन्वये तसेच शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२२.२.२०१९ मधील तरतुदीमध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्गमित करण्यात येतील. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार आर्थिक लाभ देण्यात येतील.

### अटी व शर्ती

वरील सेवा पुरविणाऱ्या इच्छुक सेवा पुरवठादार संस्थांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या अर्हता प्रमाणपत्रासह/ कागदपत्रांसह (EPF, ESIC, GST, MSME लायसन्स/ प्रमाणपत्र, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मागील ३ वर्षांचे IT returns आणि मुंबई व ठाणे या क्षेत्रातील शासकीय कार्यालयांमध्ये वाहनचालकांच्या सेवा पुरविल्याबाबतचे मागील ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र इ.) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत सादर करावेत. कागदपत्रांची पूर्तता न करणारे/ होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

जाहिरातीमधील पदांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

संपर्क :- आस्थापना शाखा (प्रशासन १), दालन क्र.५२२ (विस्तार), ५ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दूरध्वनी क्र.२२७९३६९०

**अवर सचिव**

**कृषी व पदुम विभाग**